
महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ


उच्च व तंत्र शिक्षण विभाग
डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार
पुरस्कार वर्ष २०२६
प्रा.डॉ. सुनिल पंडीत पवार
यांना उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रात अध्यापन, संशोधन कार्य, विद्यार्थी व महाविद्यालय विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय व समर्पित कार्याचा गौरव म्हणून
दि. ५ सप्टेंबर, २०२६ रोजी शिक्षक दिनानिमित
सन्मानपूर्वक प्रदान
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन


महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार
सन २०२६
प्राचार्य गट
प्रा.डॉ. सुनिल पंडीत पवार
पूज्य साने गुरुजी विद्याप्रसारक मंडळाचे, औषधनिर्माण महाविद्यालय,
शहादा, जि.नंदूरबार
यांनी उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रात विद्यार्थी व महाविद्यालय यांच्या विकासाकरिता राबविलेले उपक्रम आणि त्यांच्या उल्लेखनीय व समर्पित कार्याचा गौरव म्हणून शिक्षक दिनी दि. ५ सप्टेंबर, २०२६ रोजी त्यांना
" डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार"
सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.
राज्यमंत्री
उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य
C.B.Patil
मंत्री
उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य


महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ
- शुभहस्ते -
मा ना श्री चंद्रकांत (दादा) पाटील
प्रमुख उपस्थिती
मा. ना. इंद्रनील नाईक
निमंत्रक


महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
डॉ. के. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ
पुरस्कार वर्ष २०२४-२५ व २०२५-२६
शुभहस्ते
मा ना श्री चंद्रकांत (दादा) पाटील
प्रमुख उपस्थिती


महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ
पुरस्कार वर्ष २०२४-२५ व २०२५-२६
- शुभहस्ते -
मा ना श्री चंद्रकांत (दादा) पाटील
प्रमुख उपस्थिती
निमंत्रक



पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ
POOJIA SA
PRASARAR


पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ
PRASARAK MANDAL, NANDURBAR




COLLEGE OF PHARMACY, SHAHADA


COLLEGE OF PHARMACY, SHAHADA




॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
विद्यार्थी विकास विभाग
Kavayitri Bahinabai Chaudhari
North Maharashtra University, Jalgaon
Dept.of Students' Development








महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ




महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ
पुरस्कार वर्ष २०२४-२५ व २०२५-२६
– शुभहस्ते –
प्रमुख उपस्थिती
निमंत्रक
प्रफुल्ल पवार

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नंदुरबार आवृत्ती
epaper.deshdoot.com
06 Sep 2026 - Page 4

# प्राचार्य डॉ.पवार यांना राज्य शासनाचा आदर्श पुरस्कार

■ **शहादा । ता.प्र.**



उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, अभियांत्रिकी, औषधनिर्माण आणि कला शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या प्राचार्य व शिक्षकांना राज्य शासनाकडून दिला जाणारा डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयचे प्राचार्य डॉ.एस.पी.पवार यांना प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सन २०२५-२६ या वर्षाकरीता प्राचार्य संवर्गातून डॉ.जे.पी.नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार शिक्षक दिनी पुणे विद्यापीठ, येथे सावित्रीबाई फुले सभागृहात आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना.चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते व उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, राज्यमंत्री इंद्रनिल नाईक, अप्पर मुख्य सचिव उच्च व तंत्रशिक्षण श.बी. वेणुगोपाल रेड्डी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणेचे कुलगुरू प्रा.डॉ.सुरेश गोसावी, राज्याचे तंत्रशिक्षण संचालक डॉ. प्रमोद नाईक, राज्याचे कला संचालनालय संचालक डॉ. किशोर इंगळे, उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणेचे कुलसचिव प्रा.डॉ.प्रफुल्ल पवार, उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ.अर्चना बोऱ्हाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ.एस.पी.पवार व डॉ.जागृती पवार यांना सपत्नीक सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन सदर पुरस्काराने गौरविण्यात आले. डॉ.पवार यांचा उत्कृष्ट नेतृत्व, शिक्षणाप्रती समर्पण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वचनबद्धतेबद्दल तसेच विद्यार्थी विकास, संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासन आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासातील महत्त्वपूर्ण योगदानाची दखल प्राचार्य संवर्गातून डॉ.जे.पी.नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला.

देशोन्नती

# डॉ. एस.पी. पवार यांना 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक ..प्राचार्य.. पुरस्कार प्रदान

देशोन्नती वृत्तसंकलन

**शहादा** : उच्च व तंत्र शिक्षण, अभियांत्रिकी, औषधनिर्माण, कला आदी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या प्राचार्य व शिक्षकांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रदान करण्यात येणारा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार' पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील पंडित पवार यांना प्रदान करण्यात आला.



सन २०२५-२६ या वर्षासाठी प्राचार्य संवर्गातून निवड झालेल्या डॉ. पवार यांना शिक्षक दिनाच्या शुभदिनी संत ज्ञानेश्वर सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री नामदार चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्याचे उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृदा व जलसंधारण राज्यमंत्री नामदार इंद्रनील नाईक, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपालरेड्डी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, तंत्रशिक्षण संचालक डॉ. प्रमोद नाईक, कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. प्रफुल्ल पवार, उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. पवार यांच्यासोबत त्यांच्या पत्नी डॉ. जागृती पवार यांचाही सन्मान करण्यात आला.

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे तसेच त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय, कायम अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये व संस्थांमधील प्राचार्य आणि शिक्षकांकडून या पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते. उच्च शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत डॉ. पवार यांची या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

डॉ. पवार यांनी विद्यार्थी विकास, संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासन, नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या उत्कृष्ट नेतृत्वाची, शिक्षणाप्रती असलेल्या समर्पणाची आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल घेत त्यांना प्राचार्य संवर्गातील हा राज्यस्तरीय सन्मान देण्यात आला.

डॉ. पवार म्हणाले, 'महाराष्ट्र शासनाचा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श प्राचार्य पुरस्कार' मिळणे ही माझ्यासाठी अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. या यशामागे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय अण्णासाहेब पी. के. पाटील यांचे शैक्षणिक विचार, दूरदृष्टी व संस्कार यांचा मोठा वाटा आहे.

संस्थेचे अध्यक्ष दीपकभाई पाटील यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन तसेच समन्वयक प्रा. मकरंदभाई पाटील यांचे सातत्यपूर्ण सहकार्य मला प्रेरणा देत आले आहे.

दिव्य मराठी धुळे सिटी 09-09-2026

# लोणखेडा फार्मसी कॉलेज प्राचार्यांना पुरस्कार प्रदान



मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडून पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ.सुनील पवार.

प्रतिनिधी | शहादा

उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, अभियांत्रिकी, औषधनिर्माण आणि कला शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या प्राचार्य व शिक्षकांना राज्य शासनाकडून दिला जाणारा 'डॉ.जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार' लोणखेडा येथील पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी. पवार यांना शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे सन २०२५-२६ या वर्षाकरिता प्राचार्य संवर्गातून शनिवारी ५ सप्टेंबर या शिक्षक दिनाच्या दिवशी प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुणे येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्राचार्य डॉ.पवार यांनी हा पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी राज्यमंत्री आदिवासी विकास इंद्रनील नाईक, अप्पर मुख्य सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी आदी अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

सकाळ

# डॉ. पवार यांना आदर्श प्राचार्य पुरस्कार

**सकाळ वृत्तसेवा**

पुरुषोत्तमनगर, ता. ६ : पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील पंडित पवार यांना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे सन २०२५- २६ या वर्षासाठी प्राचार्य संवर्गातून 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार' प्रदान करण्यात आला. शिक्षक दिनानिमित्त पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात झालेल्या सोहळ्यात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते डॉ. पवार व त्यांच्या पत्नी डॉ. जागृती पवार यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.



**पुणे** : प्राचार्य डॉ. एस. पी. पवार व डॉ. जागृती पवार यांना पुरस्कार प्रदान करताना चंद्रकांत पाटील. शेजारी इंद्रनिल नाईक, बी. वेणुगोपाल रेड्डी, प्रा. डॉ. सुरेश गोसावी आदी.

डॉ. पवार यांनी शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, विद्यार्थी विकास, प्रशासन आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीत दिलेल्या योगदानाची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला. त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने नॅककडून 'अ' दर्जा व ३.१५ सीजीपीए मिळवला असून, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून सलग सहाव्यांदा 'अ' दर्जा प्राप्त केला आहे. तसेच एनबीए, एआयसीटीई आणि यूजीसीच्या २(एफ) व १२(बी) मानांकनासह महाविद्यालयाने उल्लेखनीय शैक्षणिक वाटचाल केली आहे.

डॉ. पवार यांना २५ वर्षांहून अधिक काळ अध्यापनाचा अनुभव असून त्यांचे १५० पेक्षा अधिक संशोधन निबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांनी १७ पीएच.डी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले असून, ११ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्ण केली आहे. तसेच, १५ हून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष दीपक पाटील, समन्वयक प्रा. मकरंद पाटील, पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी डॉ. पवार यांचे कौतुक केले.

तरुण भारत
09 Sep 2026 - Page 6
epaper.tarunbharatlive.com

# प्राचार्य डॉ. एस. पी. पवार यांना 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार' प्रदान



**शहादा :** उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या औषधनिमाणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. पवार यांना पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते डॉ. पवार व त्यांच्या धर्मपत्नी डॉ. जागृती पवार यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देत राज्य शासनाचा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी राज्यमंत्री इंद्रनिल नाईक, अप्पर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी आणि उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

शैक्षणिक आणि प्रशासकीय योगदान: डॉ. पवार यांना औषधनिमाणशास्त्र (फार्मसी) शिक्षण क्षेत्रातील २५ वर्षांहून अधिक अनुभव असून त्यांच्या नेतृत्वाखाली शहादा महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. डॉ. पवार यांचे १५० हून अधिक संशोधन निबंध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पत्रिकांमध्ये प्रकाशित झाले असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली १७ पीएचडी विद्यार्थ्यांनी संशोधन केले आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे सिनेट सदस्य, स्थायी समिती सदस्य आणि अभ्यास मंडळाचे चेअरमन राहिलेले आहेत. या यशाबद्दल पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दीपक पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, समन्वयक प्रा. मकरंद पाटील, विविध विद्याशाखांचे प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

दैनिक
(Marathi Daily)
खान्देश खबर

प्रतिनिधी
प्रविण भारती
तळोदा तालुका प्रतिनिधी
मो. ९३७२०२१६८९

# शहादा फार्मसीचे प्राचार्य डॉ.पवार आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

➤तळोदा । दै.खान्देश खबर



शहादा येथील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी.पवार यांना नुकताच आदर्श प्राचार्य पुरस्कार प्रदान करण्यात आला.त्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दि.५सप्टेंबर रोजी उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, अभियांत्रिकी, औषधनिर्माण आणि कला,शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या प्राचार्य व शिक्षकांना राज्य शासनाकडून दिल्या जाणाऱ्या 'डॉ.जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहादा येथिल पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी.पवार यांना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते डॉ.ए.पी. जी.नाईक आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.यावेळी उद्योग,सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास,पर्यटन, मृदा व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनिल नाईक, अप्पर मुख्य सचिव उच्च व तंत्रशिक्षण बी.वेणुगोपाल रेड्डी, कुलगुरू प्रा.डॉ.सुरेश गोसावी, तंत्रशिक्षण संचालक डॉ प्रमोद नाईक, कला संचालनालय संचालक डॉ. किशोर इंगळे, उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर, कुलसचिव प्रा.डॉ.प्रफुल्ल पवार, डॉ.अर्चना बोऱ्हाडे (सहसंचालक उच्च शिक्षण) उपस्थित होते.यावेळी प्रा. डॉ.सुनिल पवार व त्यांच्या धर्मपत्नी डॉ जागृती पवार यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.दरम्यान प्राचार्य डॉ.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली फार्मसी कॉलेज शहादा हे जिल्ह्यातील औषधनिर्माणशास्त्र शाखेतून नॅकचा 'अ' दर्जा प्राप्त करणारे कबचौ उमवि कार्यक्षेत्रातील ३.१५ सीजीपीए प्राप्त करणारे एकमेव महाविद्यालय ठरले.तसेच उमविकडून महाविद्यालयास सलग सहाव्यांदा अ दर्जा,नवी दिल्ली येथील एआयसीटीई, नॅशनल बोर्ड ऑफ अक्रिडेशनने (एनबीए) ची मान्यता, विद्यापीठ अनुदान आयोग तर्फे २(एफ) आणि १२ (बी) चे मानांकन मिळाले आहे..प्रा.डॉ.पवार हे उमवि.येथे सिनेट सदस्य तसेच प्राचार्य गटातून स्थायी समितीचे तसेच फार्माकोग्नसी व फायटोकेमिस्ट्री विभाग अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठात ते औषधनिर्माणशास्त्र विभागाच्या अभ्यास मंडळावर सदस्य आहेत.डॉ पवार यांचे आतापर्यंत १५० पेक्षा जास्त शोध निबंध तसेच संशोधन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकेत प्रकाशित झाले असून,त्यांनी अनेक परिसंवाद, कार्यशाळा आणि परिषदेमध्ये सहभाग नोंदविला आहे.त्यांनी पी.एच.डी.च्या १७ विद्यार्थ्यांना संशोधनकार्यात मार्गदर्शन केले, त्यापैकी११ विद्यार्थ्यांचे पी.एच.डी. पूर्ण झाले असून ५ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. तसेच एम.फार्मसी च्या अनेक विद्यार्थ्यांना संशोधनासाठी मार्गदर्शन केले आहे. दरम्यान १५पेक्षा जास्त पुस्तकांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशन झाले आहे. प्रा.डॉ.पवार यांच्या ह्या संपूर्ण कार्यशैली व अनुभवाच्या आधारावर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. या यशाबद्दल राजस्थान आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ पी.जी.येवले, पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दिपकबापू पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, समन्वयक प्रा.मकरंद पाटील, कृ.उ.बा. समितीचे संचालक मयूर दीपक पाटील यांनी डॉ पवार यांचे अभिनंदन केले आहे.

# डॉ.एस.पी.पवार यांना महाराष्ट्र शासनाचा 'डॉ.जे.पी.नाईक आदर्श प्राचार्य पुरस्कार'

## शहादा येथील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्यांचा राज्यस्तरीय सन्मान

दै. समाज शक्ती । प्रतिनिधी



**शहादा :** पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ संचलित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा येथील प्राचार्य डॉ. सुनील पंडित पवार यांना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सन २०२५-२६ या वर्षासाठी प्राचार्य संवर्गातून देण्यात येणारा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

शिक्षक दिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. ना. श्री. चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते डॉ. पवार यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री मा. ना. श्री. इंद्रनिल नाईक, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, तंत्रशिक्षण संचालक डॉ. प्रमोद नाईक, कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. प्रफुल्ल पवार, उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. पवार यांच्या समवेत त्यांच्या पत्नी डॉ. जागृती पवार यांचाही सन्मान करण्यात आला.

उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, अभियांत्रिकी, औषधनिर्माण तसेच कला शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या प्राचार्य व शिक्षकांना राज्य शासनाकडून हा पुरस्कार प्रदान केला जातो. विद्यार्थी विकास, संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासन आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ. पवार यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

### शैक्षणिक गुणवत्तेत महाविद्यालय उल्लेखनीय कामगिरी

डॉ. पवार यांच्या नेतृत्वाखाली औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषद अर्थात नॅककडून 'अ' दर्जा प्राप्त झाला असून, नंदुरबार जिल्ह्यातील औषधनिर्माणशास्त्र शाखेतून ३.१५ सीजीपीए प्राप्त करणारे तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील एकमेव महाविद्यालय म्हणून महाविद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

### विद्यापीठाच्या विविध समित्यांवर जबाबदारी

डॉ. पवार हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या अधिसभेचे (सिनेट) सदस्य असून प्राचार्य गटातून स्थायी समितीचे सदस्य म्हणूनही कार्यरत आहेत. तसेच फार्माकोग्नसी व फायटोकेमिस्ट्री विभागाच्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागातील औषधनिर्माणशास्त्र संशोधन व मान्यता समिती तसेच अभ्यास मंडळाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील औषधनिर्माणशास्त्र विभागाच्या अभ्यास मंडळावरही ते सदस्य म्हणून कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व मार्गदर्शन देण्याचे कार्य डॉ. पवार सातत्याने करीत आहेत.

### संस्थेकडून अभिनंदन

डॉ. पवार यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल राजस्थान आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. येवले, पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. बापूसाहेब दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष श्री. जगदीशभाई पाटील, शैक्षणिक व सामान्य प्रशासन विभागाचे समन्वयक प्रा. मकरंदभाई पाटील, मंडळाचे संचालक तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री. मयूरभाई दीपक पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले. संस्थेच्या विविध विद्याशाखांचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही डॉ. पवार यांचे अभिनंदन केले.

हा पुरस्कार माझ्यासाठी अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. या यशामागे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय मा. अण्णासाहेब पी. के. पाटील यांचे शैक्षणिक विचार, दूरदृष्टी आणि संस्कार यांचा मोठा वाटा आहे. संस्थेचे अध्यक्ष मा. बापूसाहेब दीपकभाई पाटील यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन आणि समन्वयक मा. प्रा. मकरंदभाई पाटील यांचे सातत्यपूर्ण सहकार्य मला प्रेरणा देत आले आहे. हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून संस्थेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक आणि व्यवस्थापन यांच्या सामूहिक प्रयत्नांचा सन्मान आहे. भविष्यात शिक्षण क्षेत्रात आणखी प्रामाणिकपणे व अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा या पुरस्कारामुळे मिळाली आहे.

दैनिक
महाराष्ट्र सारथी
शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज

# डॉ. जे. पी. नाईक आदर्श शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री माननीय नामदार श्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते प्रदान

शहादा येथील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी.पवार यांना पुणे येथे आयोजित महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सन २०२५-२६ या वर्षाकरीता प्राचार्य संवर्गातून डॉ. जे. पी. नाईक आदर्श शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री माननीय नामदार श्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते प्रदान..



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय शहादाचे प्राचार्य डॉ.एस.पी.पवार व सोबत त्यांच्या धर्मपत्नी डॉ जागृती पवार यांना सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सन २०२५-२६ या वर्षाकरीता प्राचार्य संवर्गातून डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार प्रदान करताना महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री माननीय नामदार श्री चंद्रकांत दादा पाटील, सोबत महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृदा व जलसंधारण राज्यमंत्री माननीय नामदार श्री इंद्रनिल नाईक, अप्पर मुख्य सचिव उच्च व तंत्रशिक्षण श्री बी. वेणुगोपाल रेड्डी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणेचे कुलगुरू प्रा.डॉ.सुरेश गोसावी, राज्याचे तंत्रशिक्षण संचालक डॉ प्रमोद नाईक, राज्याचे कला संचालनालय संचालक डॉ किशोर इंगळे, उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ शैलेंद्र देवळाणकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणेचे कुलसचिव प्रा.डॉ.प्रफुल्ल पवार, उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ.अर्चना बोन्हाडे आदी.

**दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**शहादा। प्रतिनिधी :**

उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, अभियांत्रिकी, औषधनिर्माण आणि कला शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या प्राचार्य व शिक्षकांना राज्य शासनाकडून दिला जाणारा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार' पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय शहादाचे प्राचार्य डॉ. एस. पी. पवार यांना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सन २०२५-२६ या वर्षाकरीता प्राचार्य संवर्गातून डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार ५ सप्टेंबर शिक्षक दिनाच्या शुभ दिवशी संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री माननीय नामदार श्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या शुभ हस्ते व महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृदा व जलसंधारण राज्यमंत्री माननीय नामदार श्री इंद्रनिल नाईक, अप्पर मुख्य सचिव उच्च व तंत्रशिक्षण श्री बी. वेणुगोपाल रेड्डी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणेचे कुलगुरू प्रा.डॉ.सुरेश गोसावी, राज्याचे तंत्रशिक्षण संचालक डॉ प्रमोद नाईक, राज्याचे कला संचालनालय संचालक डॉ किशोर इंगळे, उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ शैलेंद्र देवळाणकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणेचे कुलसचिव प्रा.डॉ.प्रफुल्ल पवार, उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ.अर्चना बोन्हाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ. एस. पी.पवार व त्यांच्यासोबत त्यांच्या धर्मपत्नी डॉ जागृती पवार यांना सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे तसेच त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय, आणि कायम अनुदानित विना अनुदानित महाविद्यालये व संस्थांमधील प्राचार्य आणि शिक्षकांकडून पुरस्कारासाठी प्रस्ताव मागवण्यात आले होते. उच्च शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. डॉ.पवार यांचा उत्कृष्ट नेतृत्व, शिक्षणाप्रती समर्पण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वचनबद्धतेबद्दल तसेच विद्यार्थी विकास, संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासन आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासातील महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या हा महत्वपूर्ण मानला जाणारा प्राचार्य संवर्गातून डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. डॉ पवार यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मोलाची योगदान दिले आहेत.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्याकांन व मान्यता परिषद अर्थातच नॅक तर्फे नंदुरबार जिल्ह्यातील औषधनिर्माणशास्त्र शाखेतून नॅकचा 'अ' दर्जा प्राप्त करणारे कबचौ उमवि कार्यक्षेत्रातील ३.१५ सीजीपीए प्राप्त करणारे एकमेव महाविद्यालय तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून महाविद्यालयास सलग सहाव्यांदा अ दर्जा, नवी दिल्ली येथील एआयसीटीई, नॅशनल बोर्ड ऑफ अक्रिडेशनने (एनबीए) ची मान्यता, विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) तर्फे २(f) १२(B) चे मानांकन मिळाले आहे. तसेच महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत कला, क्रीडा, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रात मार्गदर्शन करीत असतात. प्राचार्य डॉ.एस.पी.पवार हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे अधिसभा (सिनेट) सदस्य तसेच अधिसभा (सिनेट) सदस्य प्राचार्य गटातून स्थायी समितीचे सदस्य असून विद्यापीठात फार्मा कोग्नसी व फायटो केमिस्ट्री या विभागाच्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या औषध निर्माण शास्त्रच्या संशोधन आणि मान्यता समितीच्या व या विभागाच्या अभ्यास मंडळाचे चेअरमन पद त्यांनी भूषविले आहे.

तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे औषध निर्माण शास्त्र विभागाच्या अभ्यास मंडळावर सदस्य आहेत. डॉ पवार यांचे आतापर्यंत १५० पेक्षा जास्त शोध निबंध तसेच संशोधन यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकेत प्रकाशित झाले असून त्यांनी अनेक परिसंवाद, कार्यशाळा आणि परिषदेमध्ये सहभाग नोंदविला आहे. त्यांना पंचवीस वर्षापेक्षा जास्त औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) च्या विद्यार्थ्यांना अध्यापनाचा अनुभव असून डॉ. पवार यांना अनेक महाविद्यालयात आमंत्रित शिक्षक म्हणून शिकविण्यासाठी आमंत्रित केले जाते. आता पर्यंत एकूण १७ पी.एच.डी. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून कार्य केले असून त्यांना संशोधन करण्यासाठी मार्गदर्शन करीत आहे.

त्यापैकी ११ विद्यार्थ्यांचे पी.एच.डी. पूर्ण झाले असून ५ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. तसेच पदव्युत्तर (एम.फार्मसी) च्या अनेक विद्यार्थ्यांना संशोधनासाठी (रिसर्च प्रोजेक्ट) मार्गदर्शन केले आहे व १५ पेक्षा जास्त पुस्तकांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशन झाले आहे.

त्यांचा ह्या संपूर्ण कार्यशैली व अनुभवा मुळे प्राचार्य डॉ. एस. पी. पवार यांना प्राचार्य संवर्गातून डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्यांना हा पुरस्कार जाहीर झाल्या बद्दल राजस्थान आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ पी.जी.येवले, पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री बापूसाहेब दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष श्री जगदीशभाई पाटील, शैक्षणिक व सामान्य प्रशासन विभागाचे समन्वयक प्रा. मकरंदभाई पाटील, मंडळाचे संचालक तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री मयूरभाई दीपक पाटील यांनी डॉ पवार यांचे अभिनंदन केले. तसेच संस्थेच्या विविध विद्याशाखांचे प्राचार्य व प्राध्यापक वृंद तसेच कर्मचारी वृंद यांनी प्राचार्य डॉ.पवार यांचे अभिनंदन केले. त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

महाराष्ट्र शासनाचा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श प्राचार्य पुरस्कार' मला प्राप्त झाला, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. या यशामागे आमच्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय मा. अण्णासाहेब पी. के. पाटील यांचे शैक्षणिक विचार, दूरदृष्टी आणि संस्कार यांचा मोठा वाटा आहे. तसेच संस्थेचे अध्यक्ष मा. बापूसाहेब दीपकभाई पाटील यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन, तसेच समन्वयक मा. प्रा. मकरंदभाई पाटील यांचे सातत्यपूर्ण सहकार्य मला नेहमीच प्रेरणा देत आले आहे. तसेच माझे वडील सेवानिवृत्त पर्यवेक्षक श्री पी.यु.पवार, आई सौ.प्रमिला पवार व कुटुंब यांच्या मार्गदर्शन लाभत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, गुणवत्तापूर्ण शिक्षण, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि संस्थेची शैक्षणिक प्रगती यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. महाराष्ट्र शासनाने दिलेला हा सन्मान माझ्यासाठी जबाबदारी वाढवणारा असून, भविष्यात शिक्षण क्षेत्रात आणखी प्रामाणिकपणे आणि अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा देणारा आहे. हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून, माझ्या संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक आणि व्यवस्थापन यांच्या सामूहिक प्रयत्नांचा सन्मान आहे. आजपर्यंत केलेल्या कामाची पावती आणि त्याचबरोबर व्यवस्थापन मंडळाकडून मिळणारे प्रोत्साहन तसेच महाविद्यालयातील सर्व घटक यांच्या संयुक्त प्रयत्नाने हे यश आणि पुरस्कार मिळाला आहे. या सन्मानासाठी महाराष्ट्र शासनाचे, माझ्या संस्थेचे आणि माझ्या सर्व सहकाऱ्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.– डॉ. **सुनील पंडित पवारडॉ. जे. पी. नाईक उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कारप्राप्त**

दैनिक राज आज्ञा
दिनांक - ९ सप्टेंबर २०२६

# शहादा येथील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. पवार यांचा पुणे येथे सन्मान

**राज आज्ञा वृतसेवा**

**शहादा (प्रतिनिधी)-** शहादा : पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा येथील प्राचार्य डॉ. एस. पी. पवार यांना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सन २०२५-२६ या वर्षासाठी प्राचार्य संवर्गातून दिला जाणारा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संत ज्ञानेश्वर सभागृहात झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री नामदार चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते डॉ. पवार व त्यांच्या पत्नी डॉ. जागृती पवार यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी राज्यमंत्री श्री. इंद्रनिल नाईक, अपर मुख्य सचिव श्री. बी. वेणुगोपाल रेड्डी, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांच्यासह उच्च व तंत्रशिक्षण विभागातील अधिकारी उपस्थित होते.



डॉ. पवार यांच्या शैक्षणिक नेतृत्व, अध्यापन, संशोधन, विद्यार्थी विकास, प्रशासन आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीतील उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयास NAAC कडून ' अ' दर्जा, ३.१५ CGPA, विद्यापीठाकडून सलग सहाव्यांदा ' अ' दर्जा, तसेच AICTE, NBA आणि UGC (२(f) व १२(B)) मान्यता प्राप्त झाली आहे.

डॉ. पवार यांना औषधनिर्माणशास्त्र अध्यापनाचा २५ वर्षांपेक्षा अधिक अनुभव असून त्यांचे १५० पेक्षा अधिक संशोधन निबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांत प्रकाशित झाले आहेत. त्यांनी १७ पीएच.डी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले असून त्यापैकी ११ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्ण केली आहे. तसेच १५ पेक्षा अधिक पुस्तके राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित झाली आहेत.

पुरस्काराबद्दल राजस्थान आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. येवले, संस्थेचे अध्यक्ष श्री. बापूसाहेब दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष श्री. जगदीशभाई पाटील, समन्वयक प्रा. मकरंदभाई पाटील, संचालक श्री. मयूरभाई दीपक पाटील यांच्यासह संस्थेतील प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी यांनी डॉ. पवार यांचे अभिनंदन केले.

सत्य, लोकहित आणि विकास...

साप्ताहिक
# सिताई गौरव
शहादा नंदुरबार

Reg.No. MAH/MAR/2015/67037 Email-bapughodraj75@gmail.com Mob- 9860118151

कार्यालय : प्लॉट नं. १२ अ, सिताई गौरव निवास, फॉरेस्ट ऑफिस समोर, डॉर्डाचा रोड, शाहादा, जि. नंदुरबार

दि. १८ सप्टेंबर 2026

## महाराष्ट्र शासनाचा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार'

# शहादा याचा प्राचार्य डॉ. एस. पी. पवार यांना



मानाचा पुरस्कार

### उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते पुणे येथे पुरस्कार प्रदान



(छायाचित्र) सावितीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय शहादाचे प्राचार्य डॉ. एस. पी. पवार व त्यांचाा धर्मपत्ती डॉ. जागुती पवार यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन पुरस्कार प्रदान करताना महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. ना. श्री. चंद्रकांत दादा पाटील व उपस्थित मान्यवर.

### प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान

- महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री नामदार श्री चंद्रकांत दादा पाटील
- राज्यमंत्री श्री इंद्रनिल नाईक
- अप्पर मुख्य सचिव श्री. बी. वेणुगोपाल रेड्डी
- कुलगुरू प्रा.डॉ. सुरेश गोसावी
- तंत्रशिक्षण संचालक डॉ. प्रमोद नाईक
- कला संचालनालय संचालक डॉ. किशोर इंगळे
- उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर
- कुलसचिव प्रा.डॉ. प्रफुल्ल पवार
- सहसंचालक डॉ. अर्चना बोरहाडे

**शहादा, दि. १८ सप्टेंबर 2026 (प्रतिनिधी)**

पुणे येथे आयोजित महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सन 2025-26 या वर्षाकरिता प्राचार्य संवर्गातुन 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार शहादा येथील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. एस. पी. पवार यांना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्कारासाठी त्यांनी शिक्षण, संशोधन, विद्यार्थी विकास, शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासन आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासात केलेल्या कार्याची दखल घेण्यात आली. हा सन्मान त्यांच्या उत्कृष्ट नेतृत्वाचा, शिक्षणाप्रती समर्पणाचा आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांचा मानला जातो.

• उर्वरित बातमी पुढील पानावर...

### पुरस्काराचे ठळक वैशिष्ट्ये

- नॅक 'अ' दर्जा (3.15 CGPA) प्राप्त
- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून सलग 6 वा 'अ' दर्जा
- एनबीए मान्यता, UGC 2(f) & 12(B)
- 150 पेक्षा जास्त संशोधन निबंध प्रकाशित
- 17 पीएच.डी. मार्गदर्शन, 11 पूर्ण, 5 नोंदणी
- 15 पेक्षा जास्त पुस्तके प्रकाशित
- विद्यार्थी विकास, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रमांत सक्रिय
- विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर सदस्य
- विविध समितयांमध्ये महत्वपूर्ण भूमिका

"हा सन्मान माझ्या एकट्याचा नाही, तर माझ्या सहकाऱ्यांचा व संस्थेच्या सर्व घटकांचा आहे."
– डॉ. एस. पी. पवार

### डॉ. एस. पी. पवार यांचे मनोगत

"महाराष्ट्र शासनाचा हा सन्मान मला अत्यंत अभिमानाची व आनंदाची बाब आहे. या यशामागे आमच्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. मा. अण्णासाहेब पी. के. पाटील यांचे शैक्षणिक विचार व संस्कार, अध्यक्ष मा. बापूसाहेब दीपकभाई पाटील यांचे मार्गदर्शन, समन्वयक मा. मकरंदभाई पाटील यांचे सहकार्य, तसेच माझे कुटुंब, सहकारी, विद्यार्थी आणि व्यवस्थापन यांचे मोठे योगदान आहे."

– **डॉ. सुनील पंडित पवार**
डॉ. जे. पी. नाईक उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कारप्राप्त

## डॉ. एस. पी. पवार यांचे सर्वत्र अभिनंदन !

दैनिक नंदुरबार दिनांक
उत्तर महाराष्ट्र
बुधवार दि. ०९ सप्टेंबर २०२६

# प्राचार्य डॉ.एस.पी पवार यांचा पुणे येथे आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव

शहादा- येथील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी.पवार यांना पुणे येथे आयोजित महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सन २०२५-२६ या वर्षाकरीता प्राचार्य संवर्गातून डॉ. जे. पी. नाईक आदर्श शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, अभियांत्रिकी, औषधनिर्माण आणि कला शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या प्राचार्य व शिक्षकांना राज्य शासनाकडून डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार दिला जातो. शहादा येलि पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय शहादाचे प्राचार्य डॉ.एस.पी.पवार यांचा पुणे येथे डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार ना.चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते देवून गौरविण्यात आले. जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनिल नाईक, अप्पर मुख्य सचिव उच्च व तंत्रशिक्षण बी. वेणुगोपाल रेड्डी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणेचे कुलगुरू प्रा.डॉ.सुरेश गोसावी, राज्याचे तंत्रशिक्षण संचालक डॉ.प्रमोद नाईक, राज्याचे कला संचालनालय संचालक डॉ किशोर इंगळे, उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणेचे कुलसचिव प्रा.डॉ.प्रफुल्ल पवार, उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ.अर्चना बोऱ्हाडे उपस्थित होते. प्राचार्य डॉ.एस.पी.पवार व त्यांच्यासोबत त्यांच्या धर्मपत्नी डॉ.जागृती पवार यांना सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

# शहाद्याच्या प्राचार्य डॉ. एस.पी. पवार यांना राज्यस्तरीय आदर्श प्राचार्य पुरस्कार

शहादा प्रतिनिधी : पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा येथील प्राचार्य डॉ. एस.पी. पवार यांना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा सन २०२५-२६ या वर्षासाठीचा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार' प्रदान करण्यात आला. शिक्षक दिनाच्या निमित्ताने पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री नामदार चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते डॉ. पवार यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी राज्यमंत्री इंद्रनील नाईक, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, तंत्रशिक्षण संचालक डॉ. प्रमोद नाईक, कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. प्रफुल्ल पवार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. एस.पी. पवार व त्यांच्या पत्नी डॉ. जागृती पवार यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. डॉ. पवार यांनी शिक्षण, संशोधन, विद्यार्थी विकास, शैक्षणिक गुणवत्ता आणि प्रशासन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शहादा येथील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली असून, नॅक मूल्यांकनात 'अ' दर्जा व ३.१५ सीजीपीए प्राप्त केले आहे. तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर



महाराष्ट्र विद्यापीठाकडून महाविद्यालयास सलग सहाव्यांदा 'अ' दर्जा प्राप्त झाला आहे. महाविद्यालयाला एआयसीटीई, नॅशनल बोर्ड ऑफ अ‍ॅक्रेडिटेशन तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २() व १२() मानांकनाचा लाभ मिळाला आहे. डॉ. पवार यांना औषधनिर्माणशास्त्र विषयाच्या अध्यापनाचा २५ वर्षांहून अधिक अनुभव असून, त्यांचे १५० पेक्षा अधिक संशोधन निबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांमध्ये प्रकाशित झाले आहेत. त्यांनी आतापर्यंत १७ पीएच.डी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले असून, त्यापैकी ११ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्ण केली आहे. तसेच एम.फार्मसी विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्पांसाठी मार्गदर्शन केले असून, १५ पेक्षा अधिक पुस्तके राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित झाली आहेत. विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक समित्यांवरही त्यांनी महत्त्वाची जबाबदारी सांभाळली आहे. अधिसभा (सिनेट) सदस्य, स्थायी समिती सदस्य तसेच विविध अभ्यास मंडळांवर सदस्य व अध्यक्ष म्हणून त्यांनी कार्य केले आहे. पुरस्काराबद्दल बोलताना डॉ. पवार यांनी हा सन्मान केवळ वैयक्तिक नसून संस्थेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक व व्यवस्थापन यांच्या सामूहिक प्रयत्नांचा गौरव असल्याचे सांगितले. संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय अण्णासाहेब पी. के. पाटील यांच्या शैक्षणिक विचारांचा तसेच संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब दीपकभाई पाटील आणि समन्वयक प्रा. मकरंदभाई पाटील यांच्या मार्गदर्शनाचा या यशात मोठा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. पवार यांना मिळालेल्या या राज्यस्तरीय सन्मानाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, विविध विद्याशाखांचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

सा.लोकदर्पण

# शहाद्याचे प्राचार्य डॉ.एस.पी.पवार यांना महाराष्ट्र शासनाचा डॉ.जे.पी.नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार

शहादा (प्रतिनिधी)- उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, अभियांत्रिकी, औषधनिर्माण आणि कला शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या प्राचार्य व शिक्षकांना राज्य शासनाकडून दिला जाणारा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार' पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय शहादाचे प्राचार्य डॉ.एस.पी.पवार यांना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सन २०२५-२६ या वर्षाकरीता प्राचार्य संवर्गातून डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार ५ सप्टेंबर शिक्षक दिनाच्या शुभ दिवशी संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री माननीय नामदार श्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या शुभ हस्ते व महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृदा व जलसंधारण राज्यमंत्री माननीय नामदार श्री इंद्रनिल नाईक, अप्पर मुख्य सचिव उच्च व तंत्रशिक्षण श्री बी. वेणुगोपाल रेड्डी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणेचे कुलगुरू प्रा.डॉ.सुरेश गोसावी, राज्याचे तंत्रशिक्षण संचालक डॉ प्रमोद नाईक, राज्याचे कला संचालनालय संचालक डॉ किशोर इंगळे, उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ शैलेंद्र देवळाणकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणेचे कुलसचिव प्रा.डॉ.प्रफुल्ल पवार, उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ.अर्चना बोऱ्हाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ.एस.पी.पवार व त्यांच्यासोबत त्यांच्या धर्मपत्नी डॉ जागृती पवार यांना सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार' प्रदान करण्यात आला. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे तसेच त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय, आणि कायम अनुदानित विनाअनुदानित महाविद्यालये व संस्थामधील प्राचार्य आणि शिक्षकांकडून पुरस्कारासाठी प्रस्ताव मागवण्यात आले होते. उच्च शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. डॉ.पवार यांचा उत्कृष्ट नेतृत्व, शिक्षणाप्रती समर्पण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वचनबद्धतेबद्दल तसेच विद्यार्थी विकास, संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासन



महाराष्ट्र शासनाचा डॉ. जे. पी. नाईक आदर्श प्राचार्य पुरस्कार' मला प्राप्त झाला, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. या यशामागे आमच्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय मा. अण्णासाहेब पी. के. पाटील यांचे शैक्षणिक विचार, दूरदृष्टी आणि संस्कार यांचा मोठा वाटा आहे. तसेच संस्थेचे अध्यक्ष मा. बापूसाहेब दीपकभाई पाटील यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन, तसेच समन्वयक मा. प्रा. मकरंदभाई पाटील यांचे सातत्यपूर्ण सहकार्य मला नेहमीच प्रेरणा देत आले आहे. तसेच माझे वडील सेवानिवृत्त पर्यवेक्षक श्री पी.यु.पवार, आई सौ.प्रमिला पवार व कुटुंब यांच्या मार्गदर्शन लाभत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, गुणवत्तापूर्ण शिक्षण, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि संस्थेची शैक्षणिक प्रगती यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. महाराष्ट्र शासनाने दिलेला हा सन्मान माझ्यासाठी जबाबदारी वाढवणारा असून, भविष्यात शिक्षण क्षेत्रात आणखी प्रामाणिकपणे आणि अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा देणारा आहे. हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून, माझ्या संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक आणि व्यवस्थापन यांच्या सामूहिक प्रयत्नांचा सन्मान आहे. आजपर्यंत केलेल्या कामाची पावती आणि त्याचबरोबर व्यवस्थापन मंडळाकडून मिळणारे प्रोत्साहन तसेच महाविद्यालयातील सर्व घटक यांच्या संयुक्त प्रयत्नाने हे यश आणि पुरस्कार मिळाला आहे. या सन्मानासाठी महाराष्ट्र शासनाचे, माझ्या संस्थेचे आणि माझ्या सर्व सहकाऱ्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

**- डॉ. सुनील पंडित पवार, डॉ. जे. पी. नाईक उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कारप्राप्त**

आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासातील महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या हा महत्वपूर्ण मानला जाणारा प्राचार्य संवर्गातून डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. डॉ पवार यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मोलाची योगदान दिले आहेत त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषद अर्थातच नॅक तर्फे नंदुरबार जिल्ह्यातील औषधनिर्माणशास्त्र शाखेतून नॅकचा 'अ' दर्जा प्राप्त करणारे कबचौ उमवि कार्यक्षेत्रातील ३.१५ सीजीपीए प्राप्त करणारे एकमेव महाविद्यालय तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून महाविद्यालयास सलग सहाव्यांदा अ दर्जा, नवी दिल्ली येथील एआयसीटीई, नॅशनल बोर्ड ऑफ अक्रिडेशनने (एनबीए)ची मान्यता, विद्यापीठ अनुदान आयोग तर्फे २(ф) १२(इ) चे मानांकन मिळाले आहे. तसेच महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत कला, क्रीडा, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रात मार्गदर्शन करीत असतात. प्राचार्य डॉ.एस.पी.पवार हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे अधिसभा (सिनेट) सदस्य तसेच अधिसभा (सिनेट) सदस्य प्राचार्य गटातून स्थायी समितीचे सदस्य असून विद्यापीठात फार्माकोग्नसी व फायटोकेमिस्ट्री या विभागाच्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून कार्यरत आहेत. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या औषधनिर्माणशास्त्रच्या संशोधन आणि मान्यता समितीच्या व या विभागाच्या अभ्यास मंडळाचे चेअरमन पद त्यांनी भूषविले आहे. तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे औषध निर्माणशास्त्र विभागाच्या अभ्यास मंडळावर सदस्य आहेत. डॉ पवार यांचे आतापर्यंत १५० पेक्षा जास्त शोध निबंध तसेच संशोधन यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकेत प्रकाशित झाले असून त्यांनी अनेक परिसंवाद, कार्यशाळा आणि परिषदेमध्ये सहभाग नोंदविला आहे. त्यांना पंचवीस वर्षापेक्षा जास्त औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) च्या विद्यार्थ्यांना अध्यापनाचा अनुभव असून डॉ. पवार यांना अनेक महाविद्यालयात आमंत्रित शिक्षक म्हणून शिकविण्या साठी आमंत्रित केले जाते. आता पर्यंत एकूण १७ पी.एच.डी. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून कार्य केले असून त्यांना संशोधन करण्यासाठी मार्गदर्शन करीत आहे त्यापैकी ११ विद्यार्थ्यांचे पी.एच.डी. पूर्ण झाले असून ५ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. तसेच पदव्युत्तर (एम.फार्मसी) च्या अनेक विद्यार्थ्यांना संशोधनासाठी (रिसर्च प्रोजेक्ट) मार्गदर्शन केले आहे व १५ पेक्षा जास्त पुस्तकांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशन झाले आहे. त्यांचा ह्या संपूर्ण कार्यशैली व अनुभवामुळे प्राचार्य डॉ.एस.पी.पवार यांना प्राचार्य संवर्गातून डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल राजस्थान आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ पी.जी.येवले, पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री बापूसाहेब दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष श्री जगदीशभाई पाटील, शैक्षणिक व सामान्य प्रशासन विभागाचे समन्वयक प्रा.मकरंदभाई पाटील, मंडळाचे संचालक तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री मयूरभाई दीपक पाटील यांनी डॉ पवार यांचे अभिनंदन केले. तसेच संस्थेच्या विविध विद्याशाखांचे प्राचार्य व प्राध्यापक वृंद तसेच कर्मचारी वृंद यांनी प्राचार्य डॉ.पवार यांचे अभिनंदन केले. त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

# प्राचार्य डॉ.एस.पी.पवार यांना डॉ.जे.पी.नाईक आदर्श शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार प्रदान...



शहादा : उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, अभियांत्रिकी, औषधनिर्माण आणि कला शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या प्राचार्य व शिक्षकांना राज्य शासनाकडून दिला जाणारा मडॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय शहादाचे प्राचार्य डॉ.एस.पी.पवार यांना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सन २०२५-२६ या वर्षाकरीता प्राचार्य संवर्गातून डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार ५ सप्टेंबर शिक्षक दिनाच्या शुभ दिवशी संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री माननीय नामदार चंद्रकांत दादा पाटील यांच्या शुभ हस्ते व महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृदा व जलसंधारण राज्यमंत्री माननीय नामदार श्री इंद्रनिल नाईक, अप्पर मुख्य सचिव उच्च व तंत्रशिक्षण श्री बी. वेणुगोपाल रेड्डी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणेचे कुलगुरू प्रा.डॉ.सुरेश गोसावी, राज्याचे तंत्रशिक्षण संचालक डॉ प्रमोद नाईक, राज्याचे कला संचालनालय संचालक डॉ किशोर इंगळे, उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ शैलेंद्र देवळाणकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणेचे कुलसचिव प्रा.डॉ.प्रफुल्ल पवार, उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ.अर्चना बोऱ्हाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ.एस.पी.पवार व त्यांच्यासोबत त्यांच्या धर्मपत्नी डॉ जागृती पवार यांना सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन मडॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे तसेच त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय, आणि कायम अनुदानित विनाअनुदानित महाविद्यालये व संस्थांमधील प्राचार्य आणि शिक्षकांकडून पुरस्कारासाठी प्रस्ताव मागवण्यात आले होते. उच्च शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. डॉ.पवार यांचा उत्कृष्ट नेतृत्व, शिक्षणाप्रती समर्पण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वचनबद्धतेबद्दल तसेच विद्यार्थी विकास, संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासन आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासातील महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या हा महत्वपूर्ण मानला जाणारा प्राचार्य संवर्गातून डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. डॉ पवार यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मोलाची योगदान दिले आहेत त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्याकांन व मान्यता परिषद अर्थातच नॅक तर्फे नंदुरबार जिल्ह्यातील औषधनिर्माणशास्त्र शाखेतून नॅकचा अ दर्जा प्राप्त करणारे कबचौ उमवि कार्यक्षेत्रातील ३.१५ सीजीपीए प्राप्त करणारे एकमेव महाविद्यालय तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून महाविद्यालयास सलग सहाव्यांदा अ दर्जा, नवी दिल्ली येथील एआयसीटीई, नॅशनल बोर्ड ऑफ अक्रिडेशनने (एनबीए)ची मान्यता, विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) तर्फे २(ष) १२(इ) चे मानांकन मिळाले आहे. तसेच महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत कला, क्रीडा, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रात मार्गदर्शन करीत असतात. प्राचार्य डॉ.एस.पी.पवार हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे अधिसभा (सिनेट) सदस्य तसेच अधिसभा (सिनेट) सदस्य प्राचार्य गटातून स्थायी समितीचे सदस्य असून विद्यापीठात फार्माकोग्नसी व फायटोकेमिस्ट्री या विभागाच्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या औषधनिर्माणशास्त्रच्या संशोधन आणि मान्यता समितीच्या व या विभागाच्या अभ्यास मंडळाचे चेअरमन पद त्यांनी भूषविले आहे. तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे औषधनिर्माणशास्त्र विभागाच्या अभ्यास मंडळावर सदस्य आहेत. डॉ पवार यांचे आतापर्यंत १५० पेक्षा जास्त शोध निबंध तसेच संशोधन यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकेत प्रकाशित झाले असून त्यांनी अनेक परिसंवाद, कार्यशाळा आणि परिषदेमध्ये सहभाग नोंदविला आहे. त्यांना पंचवीस वर्षापेक्षा जास्त औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) च्या विद्यार्थ्यांना अध्यापनाचा अनुभव असून डॉ. पवार यांना अनेक महाविद्यालयात आमंत्रित शिक्षक म्हणून शिकविण्यासाठी आमंत्रित केले जाते. आता पर्यंत एकूण १७ पी.एच.डी.च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून कार्य केले असून त्यांना संशोधन करण्यासाठी मार्गदर्शन करीत आहे त्यापैकी ११ विद्यार्थ्यांचे पी.एच.डी. पूर्ण झाले असून ५ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. तसेच पदव्युत्तर (एम.फार्मसी) च्या अनेक विद्यार्थ्यांना संशोधनासाठी (रिसर्च प्रोजेक्ट) मार्गदर्शन केले आहे व १५ पेक्षा जास्त पुस्तकांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशन झाले आहे. त्यांचा ह्या संपूर्ण कार्यशैली व अनुभवामुळे प्राचार्य डॉ.एस.पी.पवार यांना प्राचार्य संवर्गातून डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक (प्राचार्य) पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

त्यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल राजस्थान आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ पी.जी.येवले, पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष जगदीशभाई पाटील, शैक्षणिक व सामान्य प्रशासन विभागाचे समन्वयक प्रा.मकरंदभाई पाटील, मंडळाचे संचालक तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मयूरभाई दीपक पाटील यांनी डॉ पवार यांचे अभिनंदन केले. तसेच संस्थेच्या विविध विद्याशाखांचे प्राचार्य व प्राध्यापक वृंद तसेच कर्मचारी वृंद यांनी प्राचार्य डॉ.पवार यांचे अभिनंदन केले. त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक केले जात आहे.